# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२०

३ फेब्रुवारी २०२०

# हेडलाईन्स

## आर्थिक सर्वेक्षण 2019-2020

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत आर्थिक सर्वेक्षण अहवाल 2019 -2020 सादर केला.

**अहवालातील काही आकडेवारी :**

- जागतिक मंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्था गेल्या 11 वर्षांतील नीचांकावर.

**विकासदर (GDP) :**

- 2018-19 चा विकासदर 6.8 टक्के होता. चालू आर्थिक वर्षात 2019-20 विकास दर 5 टक्केच राहणार.
- 2020-21 मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनात (GDP) 6 ते 6.5% अशी वाढ राहील.

**इतर क्षेत्रांतील वाढीचा दर :**

- आगामी आर्थिक वर्षात कृषी व संलग्न क्षेत्राच्या वाढीचा दर 2.8% असेल असा अंदाज.
- औद्योगिक उत्पादन निर्देशांकानुसार उत्पादनात 2019 साली 0.6% वाढ झाली.

**चलनफुगवटा :**

- 2014 पासून चलन फुगवट्याचा दर स्थिर आहे.

**परकीय चलन साठा :**

- सध्या परकीय चलन साठा 461 अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा आहे. 2017- 18 मध्ये 370 अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा परकीय चलन साठा होता.

**निर्यात :**

- सर्व उत्पादित वस्तूंच्या निर्यातीत 13.4 टक्के वाढ तर व्यापारी मालाच्या निर्यातीत 10.9 टक्क्यांनी वाढ झाली.
- सर्वात जास्त निर्यात झालेल्या वस्तू : पेट्रोलियम उत्पादने, औषधे, सोने व मौल्यवान वस्तू.
- सर्वात जास्त निर्यात झालेले देश : अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, चीन.

**आयात :**

- सर्व उत्पादित वस्तूंच्या आयातीत 12.7 टक्के वाढ तर व्यापारी मालाच्या आयातीत 8.6 टक्क्यांनी वाढ झाली.
- सर्वात जास्त आयात वस्तू : कच्चे तेल, सोने.
- भारतात या देशांतून सर्वाधिक आयात होते : चीन, अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया.

**रोजगार :**

- संघटित क्षेत्राचे रोजगारामध्ये प्रमाण 22.8 टक्के झाले जे पूर्वी 17.9 टक्के होते.
- 2011 ते 18 या काळात शहरी तसेच ग्रामीण भागात 2.62 कोटी नवे रोजगार निर्माण झाले.
- 2011- 12 च्या तुलनेत 2017-18 मध्ये महिलांचे रोजगार निर्मितीचे प्रमाण 8 टक्क्यांनी वाढले.

**GST व महागाई :**

- जीएसटी संकलनामध्ये वाढ तर महागाई दरात घट नोंदविली गेली.

**भारतावरील बाह्य कर्ज :**

- 2016-17 : 471 अब्ज डॉलर्स.
- 2019- 20 : 557 अब्ज डॉलर्स. (सप्टेंबर अखेर)

**दरडोई उत्पन्न (बाजार मुल्यानुसार) :**

- 2011- 12 : 63462 रू.
- 2019 - 20 : 135050 रु.

**दरडोई उत्पन्न (स्थिर मूल्यानुसार) :**

- 2011-12 : 63462 रु.
- 2019-20 : 965063 रु.

## भारताचा परकीय चलनसाठा सर्वोच्च पातळीवर

- भारतीय रिझर्व बँकेच्या अहवालानुसार 17 जानेवारी रोजी भारताचा परकीय चलनसाठा 94.3 कोटी डॉलर्सने वाढून 462.16 अब्ज डॉलर्स या आजवरच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे.
- सध्या जगातील सर्वाधिक परकीय चलनसाठा असलेल्या देशांच्या यादीमध्ये भारत 8 व्या स्थानी आहे. या यादीमध्ये चीन पहिल्या स्थानी आहे.

**परकीय चलनसाठा**

- परकीय चलनसाठ्याला फोरेक्स रिझर्व (foreign exchange reserve ) असे संबोधले जाते. देशाच्या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक स्थितीचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.
- अमेरिकन डॉलर्समध्ये मोजल्या जाणाऱ्या परकीय

चलनसाठ्यामध्ये गैर अमेरिकन चलनांच्या (म्हणजेच युरो, ब्रिटिश पाउंड, जपानी येन) विनिमयमूल्यात होणारी घट किंवा वाढीचा परिणाम समाविष्ट असतो.

- थेट गुंतवणूक, त्याचबरोबर शेअर बाजारात झालेली गुंतवणूक याचा विचार करून परकीय चलन विनिमय दरानुसार या साठ्यांचे मूल्यांकन केले जाते.
- परकीय चलनसाठा केंद्रीय बँकांसाठी महसूल मिळवण्याच्या प्रमुख स्त्रोतांपैकी एक आहे, ज्या परकीय सरकारी रोख्यांमध्ये, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये व इतर सुरक्षित गुंतवणुकीच्या पर्यायांमध्ये गुंतवणूक करतात.
- कोणत्याही देशाच्या परकीय चलनसाठ्यात पुढील 4 बाबी समाविष्ट असतात :

1. परकीय चलनातील साठा
2. सोन्याच्या स्वरूपातील साठा
3. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे विशेष आहरण अधिकार (Special Drawing Rights)
4. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडील राखीव निधी

## अखेर ब्रिटन युरोपियन युनियनमधून बाहेर

- ब्रेग्झिटच्या 2016 मधील निर्णयानंतर प्रत्यक्ष युरोपीय समुदायातून बाहेर पडण्यास ब्रिटनला 43 महिने लागले.

**आतापर्यंतचा ब्रेग्झिटचा प्रवास :**

- 21 जानेवारी 2013 : पंतप्रधान डेव्हिड कॅमेरून यांनी 2015 च्या निवडणुकीत हुजूर पक्षास बहुमत दिल्यास ब्रिटनला युरोपीय समुदायातून बाहेर काढण्याबाबत जनमत घेण्याचे आश्वासन दिले.
- 7 मार्च 2015 : हुजूरपक्षाने मजूर पक्षावर मोठा विजय संपादन केला.
- 23 जून 2016 : ब्रिटनने युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याच्या बाजूने कौल दिला. 52 टक्के लोकांनी ब्रेग्झिटचे समर्थन केले तर 48 टक्के लोकांनी विरोध केला. डेव्हिड कॅमेरून यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.
- 13 जुलै 2016 : थेरेसा मे यांच्या हुजूरपक्षाने निवडणूक लढवली. विजयानंतर मे पंतप्रधान.
- 29 मार्च 2017 : मे यांनी युरोपीय मंडळाचे अध्यक्ष डोनाल्ड टस्क यांना अनुच्छेद 50 बाबत पत्र पाठवले. त्यानंतर बाहेर पडण्यासाठी 29 मार्च 2019 ही मुदत निश्चित केली.
- 18 एप्रिल 2017 : मे यांनी मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या. 8 जूनला निवडणूक.
- 8 जून 2017 : मे यांचे हाऊस ऑफ कॉमन्समधील बहुमत संपुष्टात.
- 17 जून 2017 ब्रेग्झिट बोलणी ब्रसेल्स येथे सुरू.
- 19 मार्च 2018 : ब्रिटन व युरोपीय समुदाय यांनी ब्रिटनच्या माघारी कराराचा मसुदा प्रकाशित केला. पण त्याला मान्यता नाही.
- 6 जुलै 2018 : पंतप्रधान मे यांनी मंत्रिमडंळाला 'चेकर्स' योजना सांगितली.
- 8 जुलै 2018 : ब्रिटनचे ब्रेग्झिटमंत्री डेव्हिड डेव्हिस यांचा राजीनामा. परराष्ट्रमंत्री बोरिस जॉन्सन यांचा राजीनामा.
- 15 नोव्हेंबर 2018 : डॉमनिक राब यांचा ब्रेग्झिट मंत्रिपदाचा राजीनामा.
- 25 नोव्हेंबर 2018 : 27 युरोपीय देशांच्या नेत्यांची ब्रेग्झिट करारास मंजुरी.
- 13 डिसेंबर 2018 : पंतप्रधान मे विश्वास ठरावात वाचल्या.
- 15 जानेवारी 2019 : खासदारांनी मे यांची ब्रेग्झिट योजना फेटाळली. 432 विरुद्ध 202 मतांनी ऐतिहासिक नकार.
- 12 मार्च 2019 : खासदारांनी सरकारची ब्रेग्झिट योजना पुन्हा 391 विरुद्ध 242 मतांनी फेटाळली.
- 20 मार्च 2019 मे यांनी युरोपीय समुदायास ब्रेग्झिटची मुदत 29 मार्च ऐवजी 30 जून ठेवण्यास कळवले.
- 29 मार्च 2019 खासदारांनी मे यांचा माघारी करार 344 विरुद्ध 286 मतांनी फेटाळला. त्या दिवशी ब्रिटन युरोपीय समुदायातून बाहेर पडणे अपेक्षित होते पण तसे झाले नाही.
- 10 एप्रिल 2019 : युरोपीय समुदायाने 31 ऑक्टोबरची मुदत दिली.
- 24 मे 2019 : मे यांनी हुजूर पक्षनेतेपदाचा राजीनामा देण्याचे जाहीर केले. 7 जूनला पद सोडण्याचे सूतोवाच.
- 7 जून 2019: मे यांनी राजीनामा दिला.
- 23 जुलै 2019 : बोरिस जॉन्सन यांची हुजूरपक्षाच्या नेतेपदी निवड. ब्रिटनचे ते नवे पंतप्रधान.
- 28 ऑगस्ट 2019 : ब्रिटनची संसद पाच आठवडे संस्थगित.

- 3 सप्टेंबर 2019 : हुजूर पक्ष खासदारांनी सरकारच्या 31 ऑक्टोबर मुदतीच्या धोरणाविरोधात मतदान केले.
- 3 ऑक्टोबर 2019 : ब्रिटन सरकारने नवीन ब्रेग्झिट योजना ब्रसेल्सला सादर केली.
- 17 ऑक्टोबर 2019 : ब्रिटन व युरोपीय समुदाय यांनी नवीन ब्रेग्झिट कराराची घोषणा केली.
- 19 ऑक्टोबर 2019 : विशेष बैठकीत ब्रिटिश खासदारांनी करारास मान्यता रोखली. ब्रेग्झिटसाठीचे कायदे करण्याची अट घातली.
- 22 ऑक्टोबर 2019 : जॉन्सन यांनी ब्रेग्झिट कायद्यावर विराम घेतला. खासदारांचा कायद्यास आक्षेप होता.
- 28 ऑक्टोबर 2019 : युरोपीय समुदायाने ब्रिटनचा होकार स्वीकारला, 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली.
- 29 ऑक्टोबर 2019 : हाऊस ऑफ कॉमन्सने 12 डिसेंबरला निवडणूक घेण्यास मान्यता दिली.
- 12 डिसेंबर 2019 : पंतप्रधान जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली हुजूरपक्षाचा विजय हाऊस ऑफ कॉमन्समध्ये 80 जागांनी बहुमत.
- 23 जानेवारी 2020 : ब्रिटनच्या युरोपीय समुदाय माघार विधेयकाचे कायद्यात रूपांतर, संसदेत विधेयक मंजूर.
- 29 जानेवारी 2020 : युरोपीय संसदेची ब्रेग्झिट काडीमोड करारास मान्यता.
- 30 जानेवारी 2020 : अंतिम करारावर जॉन्सन व युरोपीय समुदायाच्या नेत्यांच्या स्वाक्षऱ्या.
- 31 जानेवारी 2020 : ब्रिटन युरोपीय समुदायातून बाहेर.

## जगातील सर्वाधिक ट्रॅफिक असलेल्या शहरात बेंगळूरू प्रथम

- सध्या वाढत जाणारी ट्रॅफिक ही जगासमोर असलेली मोठी समस्या आहे. वायू प्रदूषणाबरोबरच ध्वनी प्रदूषणातही मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्यामुळे जगासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.
- शहर मोबिलिटी क्षेत्रात काम करणाऱ्या खासगी संस्थेने आणि लोकेशन टेक्नॉलोजी एक्सपर्ट टॉमटू (TOM2) च्या एका सर्व्हेनुसार जगात सर्वांत जास्त ट्रॅफिक असलेल्या पहिल्या 10 शहरांत भारतातील 4 शहरांचा समावेश आहे.
- दिल्लीमध्ये 23 ऑक्टोबर 2019 रोजी सर्वात जास्त 81% पर्यंत ट्रॅफिक होते.

**जगातील सर्वांत जास्त ट्रॅफिक असलेली 10 शहरे :**

1. बेंगळूरू
2. मनिला, फिलिपाइन्स
3. बोगोटा, कोलंबिया
4. मुंबई
5. पुणे
6. मॉस्को, रशिया
7. लिमा, पेरू
8. दिल्ली
9. इस्तंबूल, तुर्की
10. जकार्ता, इंडोनेशिया

## गर्भपाताच्या कालावधीत वाढ

- नुकतेच 'वैद्यकीय गर्भपात दुरुस्ती विधेयक 2020' याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याद्वारे 'वैद्यकीय गर्भपात कायदा 1971' (Medical Termination of Pregnancy Act 1971) मध्ये दुरुस्ती केली जाईल.

**नव्याने समाविष्ट केलेल्या तरतुदी :**

- 20 आठवड्यांपर्यंतच्या गर्भपातासाठी एका डॉक्टरचा व 20 ते 24 आठवड्यांपर्यंतच्या गर्भपातासाठी दोन डॉक्टरांचा सल्ला घेणे बंधनकारक.
- गर्भपात करणाऱ्या महिलेचे नाव तसेच इतर माहिती कायद्याने अधिकार दिलेल्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला दिली जाणार नाही.
- आतापर्यंत 20 आठवड्या पर्यंतच्या गर्भपातासाठी परवानगी दिली जात होती तर त्यापुढील कालावधीसाठी अपवादात्मक परिस्थितीत गर्भपातासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक होती. आता हा कालावधी 24 आठवड्यांचा केल्याने यातील अडचणी दूर होतील.

**कायद्याची आवश्यकता :**

- बलात्कार पीडित, दिव्यांग महिला, अल्पवयीन मुली, गुन्हेगारीमुळे लादले गेलेले गरोदरपण व काही विशिष्ट घटनांच्या बाबतीत सहाव्या महिन्याच्या अखेरपर्यंतही कायदेशीर गर्भपात करून घेणे शक्य व्हावे यासाठी हा बदल.

**महत्त्वाचे :**

- भारतात व जगात अनेक देशांमध्ये गर्भपातास कायदेशीर

परवानगी आहे, परंतु लिंग तपासणी करून गर्भपात करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे यासाठी वैद्यकीय गर्भपात कायदा 1971 आणला गेला व 1 एप्रिल 1972 रोजी तो लागू झाला.

- गर्भधारणेमुळे गरोदर स्त्रीच्या जीवाला धोका असेल किंवा तिला मानसिक, शारीरिक इजा पोहोचणार असेल तसेच गर्भात शारीरिक व्यंग येण्याची शक्यता असेल तर शासकीय किंवा शासनमान्य रुग्णालयातर्फे गर्भपाताची परवानगी दिली जाते.
- भारतात दरवर्षी सुमारे 65 लाख गर्भपात होतात, त्यातील सुमारे 56% गर्भपात हे असुरक्षित असतात.
- जगभरात दरवर्षी अंदाजे 68 हजार स्त्रिया असुरक्षित गर्भपातामुळे मृत्युमुखी पडतात. यातील 97% स्त्रिया अविकसित वा विकसनशील देशांतील आहेत.

## भुवन पंचायत 3.0

- 29 जानेवारी 2020 रोजी इस्रोने भुवन पंचायत आवृत्ती 3.0 लाँच केली.
- या प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत सदस्यांसह त्यांच्या डेटाची आवश्यकता समजण्यासाठी सहयोग करेल.
- इस्रोच्या उपग्रह तंत्रज्ञानाच्या मदतीने हे पोर्टल कार्य करेल.
- हा प्रकल्प दोन वर्षे चालणार आहे. पंचायतराज मंत्रालयाच्या अंतर्गत विकास नियोजन प्रक्रियेचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न सदर प्रकल्प करेल.

**भुवन प्रकल्प :**

- भुवन हे गुगल अर्थ आणि विकिमॅपिया यांच्याशी साधर्म्य असणारे उपग्रहीय चित्रणाचे साधन आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) त्याचा विकास केलेला आहे.
- दहा मीटरपर्यंतचे विभेदन (अर्थात जमिनीवर एकमेकींपासून 10 मी इतक्या अंतरावर असणाऱ्या दोन वस्तू स्पष्टपणे वेगळ्या दाखविणे) पुरविणारे हे साधन गुगल अर्थ आणि विकिमॅपियाचे प्रतिस्पर्धी मानले जाते.
- भूसंपदा विभागाबरोबरच इस्रोने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची देखरेख करण्यासाठी 'सृष्टी' प्रणाली विकसित केली आहे.

## विधानपरिषद रद्द करण्याचा आंध्रप्रदेश राज्य विधिमंडळाचा निर्णय

- आंध्रप्रदेश राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विधानपरिषद रद्द करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.
- विधान परिषद रद्द करण्याचा ठराव मांडण्याबद्दल जगनमोहन रेड्डी यांनी यापूर्वी म्हटले होते, की देशातील 28 राज्यांपैकी केवळ सहा राज्यांतच विधानपरिषद अस्तित्वात आहे. यावरून विधान परिषदेविना चालविण्यात येणारे सरकार चांगल्या पद्धतीने कारभार करू शकते, हे लक्षात येते.
- विधान परिषदेत अनुभवी व राजकीय विद्वानांसह विविध क्षेत्रांतील ज्येष्ठांची निवड केली जाते. हे सदस्य सरकारला वेगवेगळ्या मुद्द्यांवर आणि विधेयकांवर सल्ला देतात.

**विधानपरिषद रद्द करण्याची प्रक्रिया :**

- संबंधित राज्याच्या विधानसभेने विधानपरिषद रद्द करण्याचा ठराव संमत करून तो संसदेकडे पाठवावा लागतो.
- त्यानुसार संसद अस्तित्वात असलेली विधानपरिषद रद्द करू शकते किंवा ठराव अमान्य करू शकते.
- राज्य विधानसभेने असा ठराव विशेष बहुमताने (विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येपैकी बहुमताने आणि विधानसभेत उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन तृतीयांश बहुमताने) संमत केला पाहिजे.
- संसदेने या संदर्भात केलेला कायदा हा घटनादुरुस्ती समजली जाणार नाही. संसद हा ठराव साध्या बहुमताने संमत करते.

## आसाममध्ये शांतीचे नवे पर्व : ऐतिहासिक बोडो करारावर स्वाक्षऱ्या

- बोडोभूमीचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने 27 जानेवारी रोजी आसाममधील नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलँड (NDFB) या बंडखोर गटासोबत करार केला. त्यानुसार या संघटनेचे 1550 नक्षलींनी 30 जानेवारी रोजी आत्मसमर्पण केले.
- या करारावर वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी आंदोलन

करणाऱ्या ऑल बोडो स्टुडंट्स युनियनेही (ABSU) स्वाक्षरी केली.

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, आसामचे मुख्यमंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत सोमवारी बोडो नक्षलवाद्यांच्या प्रतिनिधींनी त्रिपक्षीय शांती करारावर स्वाक्षरी केल्या. दरम्यान, या शांती करारास बोडोलँड क्षेत्रीय परिषद या संघटनेने विरोध केला आहे.
- शांती करारामुळे आसाममध्ये शांती, सद्‌भावना आणि एकात्मतेची नवी पहाट उगवेल. बोडो नागरिकांच्या अनोख्या संस्कृतीचे रक्षण होईल. तसेच विकासाचे नवे पर्व अवतरेल. शांती करारामुळे आजचा दिवस भारतीयांसाठी विशेष ठरला आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांती कराराचे स्वागत केले.

**करारातील तरतुदी :**

- NDFB चे सुमारे 1550 फुटीरतावादींनी शस्त्रांनिशी समर्पण केले.
- आगामी तीन वर्षांत बोडोलँडच्या विकासासाठी 1500 कोटींचा निधी दिला जाणार (केंद्र-राज्य 50-50 टक्के).
- बोडोलँड टेरीटोरियल कौन्सिलच्या अधिकारांत वाढ करणार.
- या क्षेत्रातील विधानसभेच्या जागा वाढवून 60 करणार. (सध्या 40 आहेत.)
- Bodoland Territorial Council - BTC (स्थापना 2003) मध्ये बोडोबहुल गावांच्या समावेशासाठी आयोग स्थापन केला जाईल. यातून अल्पसंख्याक गावे वगळण्यात येतील. या भागाचे नाव Bodoland Territorial Region असे होईल.

**करारामुळे होणारे लाभ :**

- आसामचे विभाजन टळेल.
- बोडो भागाला आणखी स्वायत्तता मिळणार.

**काय आहे बोडोलँड वाद :**

- 1980 च्या सुमारास आसाममधील बोडोबहुल भागात वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी 'ऑल बोडो स्टुडंट युनियन', 'नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलँड' या संघटनांच्या नेतृत्वात आंदोलन चालू झाले.
- केंद्र सरकारकडून 'बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा 1967' अंतर्गत या संघटनांवर बंदी घालण्यात आली आणि या हिंसाचारादरम्यान सुमारे 4000 जणांनी प्राण गमावले.
- बोडो बहुल भाग : BTC क्षेत्रातील कोक्राझार, चिरांग, बक्सा, उदलगिरी हे चार जिल्हे. या भागाला Bodoland Territorial Area District म्हणतात.

**आतापर्यंतचे 2 करार :**

- पहिला करार : 1993, या करारांतर्गत आसाम मध्ये स्वायत्त परिषदेची स्थापना झाली.
- दुसरा करार : 2003, हा करार 'बोडो लिबरेशन टायगर्स' बरोबर झाला. या अंतर्गत बोडो बहुल जिल्ह्यांसाठी Bodoland Territorial Council ची स्थापना केली गेली.

## कोलकात्यात हुगळी नदीखाली 'पाण्याखाली धावणारी पहिली मेट्रो'

- पाण्याखालून धावणाऱ्या देशातल्या पहिल्या मेट्रो सेवेचे बांधकाम आता शेवटच्या टप्प्यावर आले आहे. पश्चिम बंगालची राजधानी कोलकातामध्ये हुगळी नदीखालून ही मेट्रो धावणार आहे.
- देशातली पहिली पाण्याखालून धावणारी रेलगाडी 'सॉल्टलेक सेक्टर-5 आणि हावडा मैदान' यादरम्यान धावणार आहे. तसेच हा रेल्वेमार्ग दोन टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात येत आहे. त्यातला पहिला टप्पा 2022 सालापर्यंत प्रवाशांसाठी खुला केला जाण्याची अपेक्षा आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

- या रेल्वेला जलप्रवाहापासून वाचवण्यासाठी एक भक्कम बोगदा तयार करून उच्चस्तरीय सुरक्षा कवच देण्यात आले आहे.
- नदीच्या मधून जाणारा हा मार्ग 520 मीटर लांब असून ती नदीच्या तळापासून 30 मीटरच्या खोलीवर आहे. नदीखालून रेल्वेला हे अंतर पार करण्यासाठी 60 सेकंदांचा वेळ लागणार आहे.
- या प्रकल्पासाठी हावडा ते कोलकाता दरम्यानच्या मेट्रो मार्गाला जोडणाऱ्या हुगळी नदीखाली दुहेरी बोगद्याचे बांधकाम केले गेले. देशातला हा पहिलाच नदीखालचा बोगदा ठरला.

- कोलकातामधील रेल्वेच्या 16.6 किमी लांबीच्या पूर्व-पश्चिम मेट्रो प्रकल्पाच्या अंतर्गत 520 मीटर लांबीचा हा बोगदा तयार करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र सरकारच्या फक्त 10 रुपयांमध्ये शिवभोजन योजनेला प्रजासत्ताक दिनी सुरुवात

- राज्यातल्या गरीब आणि गरजू नागरिकांना सवलतीच्या दरात जेवण उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पुढाकारातून शिवभोजन योजनेची अंमलबजावणी राज्यात 26 जानेवारी 2020 पासून करण्यास सुरुवात झाली आहे.
- योजनेच्या अंतर्गत पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयात किमान एक भोजनालय सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने चालू वित्तीय वर्षात उर्वरित तिमाहीसाठी 6.48 कोटी रुपयांची रक्कम अनुदान म्हणून उपलब्ध करून दिली आहे.

**योजनेचे स्वरूप :**

- योजनेमध्ये एका थाळीची किंमत शहरी भागात 50 तर ग्रामीण भागात 35 रुपये आहे. ज्यामध्ये केवळ 10 रुपये ग्राहकांकडून घेतले जाणार आणि उर्वरित रक्कम सरकार अनुदान स्वरुपात देणार आहे.
- ही योजना राबविण्यासाठी खानावळ, स्वंयसेवी संस्था, महिला बचतगट, भोजनालये, रेस्टॉरंट अथवा मेस यांची समितीमार्फत निवड करण्यात येत आहे.
- समितीने पात्र ठरवलेल्या खानावळ, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, भोजनालय, रेस्टॉरंट, मेस यामध्ये प्रत्येक ग्राहकाकडून प्राप्त झालेल्या 10 रुपयांव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून अन्न नागरी पुरवठा विभागाकडून थेट जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार.
- मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासंबंधी हे अनुदान नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांना देण्यात येणार आहे. ते शिवभोजन ॲपमध्ये भरलेल्या माहितीची परिगणना करून संबंधिताना हे अनुदान दर पंधरा दिवसांनी ऑनलाईन पद्धतीने वितरित करतील.
- ही भोजनालये दुपारी 12 ते 2 या वेळेत कार्यरत राहणार असून भोजनालयात एका वेळी किमान 25 व्यक्तींच्या जेवणासाठी बसण्याची व्यवस्था असणार आहे. एका भोजनालयात किमान 75 ते कमाल 150 थाळी भोजन उपलब्ध होणार आहेत.

## महाराष्ट्र सायबर विभागातर्फे चाईल्ड पॉर्नोग्राफी विरोधात 'ऑपरेशन ब्लॅकफेस'

- महाराष्ट्रामध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचार यांबाबत तब्बल 1700 व्हिडीओ क्लिप आढळून आल्या आहेत.
- महाराष्ट्र सायबर विभागाने दोन महिन्यांपासून ऑपरेशन ब्लॅकफेस मोहीम हाती घेतली व व्हिडीओ क्लिप प्रसिद्ध करणाऱ्यांविरोधात राज्यभरात गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.
- या मोहिमेअंतर्गत ह्या व्हिडिओ क्लिपच्या मुळाशी जाऊन त्या क्लिप तयार करणाऱ्या व प्रसारमाध्यमांवर प्रसिद्ध करणाऱ्यांचा छडा लावण्यात येणार आहे.
- अमेरिकेतील National Center of Missing And Exploited Children (NMEC) ही संस्था चाईल्ड पोर्नोग्राफी विरोधात कार्यरत आहे.
- या संस्थेने भारतातील केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागा (NCRB) सोबत करार केला असून या करारानुसार संस्थेने चाईल्ड पोर्नोग्राफी पसरविणारे आयपी ड्रेस आणि अन्य तांत्रिक माहिती NCRB ला पुरवली जाते.
- गेल्या दोन आठवड्यात महाराष्ट्रात एकूण 24 गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.
- ऑपरेशन ब्लॅकफेस अंतर्गत गुन्हे नोंदवून किंवा आरोपींवर कारवाई करण्यासोबत प्रत्यक्ष लैंगिक अत्याचार घडलेल्या बालकांना शोधून त्यांचे पुनर्वसन करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

## मादागास्कर येथे आपत्ती निवारणासाठी भारतीय नौदलाचे 'ऑपरेशन व्हॅनिला'

- 29 जानेवारी 2020 रोजी भारतीय नौदलाने दक्षिण हिंद महासागरात ऑपरेशन व्हॅनिला सुरू केले.
- चक्रीवादळ डियानमुळे प्रभावित झालेल्या मादागास्करच्या लोकांच्या मदतीसाठी हे ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. भारतीय नौदलाचे जहाज

ऐरावत मदत अभियानात तैनात केले आहे.

- मादागास्कर : हिंद महासागरातील एक बेट देश आहे.
- जगातील चौथे सर्वात मोठे बेट. मादागास्कर आणि कोमोरोस यांना त्यांच्या हिंदी महासागरात त्यांच्या सामरिक स्थानासाठी समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुसरीकडे, सेशेल्स आणि मॉरिशस हे भाग आहेत.

**13 ऑक्टोबर : आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिन**

- मार्च 2015 मध्ये सेंदाई, जपान येथे झालेल्या आपत्ती जोखीम घटनेच्या तिसऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत आपत्ती जोखीम कमी 2015-2030 साठी 'सेंदेई फ्रेमवर्क' स्वीकारण्यात आला.
- 2015 च्या विकास अजेंडाचा हा पहिला प्रमुख करार आहे. त्यात सात लक्ष्ये आणि कारवाईसाठी चार प्राधान्यक्रम आहेत.
- आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी आणि आपत्तींना उत्तम पद्धतींना प्रतिसाद देण्यासाठी ही सरकार, NGOs, स्थानिक सरकारे, समुदाय गट, खासगी क्षेत्रे इत्यादींसह सर्व संघटनांना एकत्रित करणारी ही मोहीम आहे.
- जपानच्या सेंदाई येथे आयोजित आपत्ती जोखीम कमी करण्याच्या जागतिक परिषदेत ते यूएनने स्वीकारले होते. याअगोदर 2005 - 2015 सालासाठी ह्योगो आराखडा स्वीकारण्यात आला होता.

## नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्याचा 'रामसार' यादीत समावेश

- अखेर नांदूर-मधमेश्वरला असा दर्जा मिळाल्यामुळे नाशिक वन्यजीव विभागाच्या 10 वर्षांच्या प्रयत्नांना फळ मिळाले असून हे महाराष्ट्रातील पहिलेच स्थळ ठरले आहे.
- जगभरातील पाणथळ जागांच्या संरक्षणासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी इराणमधील रामसार येथे 2 फेब्रुवारी 1971 रोजी परिषद घेण्यात आली होती, म्हणून 2 फेब्रुवारी 'जागतिक पाणथळ दिवस' 1997 पासून साजरा होतो.
- या परिषदेतील ठरावाला रामसार ठराव म्हणून ओळखले जाते व तो 1975 पासून लागू करण्यात आला.
- भारताने हा करार 1982 ला स्वीकारला व 1985-86 या वर्षी पाणथळ संवर्धन कार्यक्रम जाहीर केला.
- भारताने जरी हा करार 1982 ला स्वीकारला असला तरीही केवलदेव राष्ट्रीय उद्यान (राजस्थान) व चिल्का सरोवर (ओडिशा) हे रामसार यादीमध्ये 1981 साली समाविष्ट करण्यात आले.
- मागील वर्षी 'सुंदरबन पाणथळ क्षेत्र' (प.बंगाल) 1 फेब्रुवारी 2019 रोजी रामसार यादीत समावेश.

**महत्त्वाचे:**

- भारतातील सर्वात मोठे पाणथळ क्षेत्र : सुंदरबन (प.बंगाल)
- भारतातील सर्वात छोटे पाणथळ क्षेत्र : रेणुका सरोवर (हिमाचल प्रदेश)

**Montreux Records :**

- प्रदूषण किंवा मानवी हस्तक्षेपामुळे ज्यांच्या परिस्थितीकीय स्वरूपामध्ये बदल झालेले आहेत किंवा नजीकच्या काळात बदल होण्याची शक्यता आहे, अशा जागतिक महत्त्वाच्या दलदलीय परिसंस्थांचा या नोंदीमध्ये समावेश केला जातो.
- रामसर यादीचा एक भाग म्हणूनच मॅट्रिक्स नोंद ठेवली जाते.
- भारतातून केवलदेव राष्ट्रीय उद्यान (राजस्थान) व लोकतक सरोवर (मणिपुर) हे या यादीत समाविष्ट केले आहेत.

## आफ्रिकन चित्ता भारतात

- दक्षिण आफ्रिकेतला चित्ता भारतीय जंगलात आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची परवानगी दिली.
- भारतातल्या अधिवासात आफ्रिकेतला चित्ता आणता येणार आहे. आपल्या चपळतेसाठी ओळखला जाणारा चित्ता भारतातून नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.
- त्यामुळे आफ्रिकेतल्या नामिबिया देशामधून चित्ता आणण्याची परवानगी मागणारी याचिका राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (NTCA) सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. सरन्यायाधीश एस. ए. बोबडे आणि न्या. बी. आर. गवई आणि सूर्यकांत यांच्या खंडपीठाने या याचिकेवरील सुनावणी केली.

**राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA)**

- भारतातल्या व्याघ्र प्रकल्पांच्या पुनर्गठित

व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची स्थापना डिसेंबर 2005 मध्ये झाली.
- 'टायगर प्रोटेक्शन प्रोग्रॅम' (व्याघ्र प्रकल्प) 1973 साली भारत सरकारने WWF या जागतिक संस्थेच्या सहकार्याने सुरू केला.
- 'वन्यजीव संरक्षण कायदा 1972' मध्ये 2006 साली दुरुस्ती करण्यात आली, ज्यामुळे संकटात सापडलेल्या वाघांच्या (तसेच वाघ या प्रजातीतले इतर पशू) संरक्षणासाठी व्याघ्र प्रकल्प योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणारी 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण' ही संस्था स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. पर्यावरण व वनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

## तामिळनाडूत पालीच्या 2 नव्या प्रजातींचे संशोधन

- तामिळनाडूच्या पर्वतरांगेमध्ये संशोधकांनी पालीच्या 2 नव्या प्रजातींचे संशोधन झाले आहे. संशोधकांचे पथक गेल्या अनेक महिन्यांपासून तामिळनाडूमधील पर्वतरांगांमध्ये संशोधन करत आहे.
- 'हेमीफायलोडक्टायलस' (स्लेनडर गेको) या कुळातील पाली फक्त पश्चिम भारतात म्हणजेच कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेशमधील पूर्व घाट भाग येथे आढळतात.
- या पालीच्या कुळातील 4 प्रजातींची नोंद झाली आहे. त्यांपैकी 3 प्रजातींचा शोध या पथकाने गेल्या वर्षी लावला होता. तसेच पूर्ण अभ्यास व संशोधनाअंती त्यांचे निष्कर्ष व शोधप्रबंध 'झुटाकसा' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झाला.

**महत्त्वाचे :**
- भारतातील पालीच्या प्रजातींची एकूण संख्या : 6
- शास्त्रीय नाव- हेमिडकक्टायलस फ्रेनाटस (Helidactylus frenatus)
- हा सरड्यांच्या गटातील प्राणी आहे.
- मुख्यतः आग्नेय आशिया व उत्तर आफ्रिका खंडातला हा प्राणी पॅसिफिक गेको, आशियायी गेको या नावांनीही ओळखला जातो.
- हा निशाचर प्राणी असून निवासी इमारतीवरील दिव्यांजवळ फिरणारे किडे खाण्यासाठी घराच्या, इमारतींच्या भिंतीवर आढळतो.

## राणी रामपाल यांना वर्ल्ड गेम्स सर्वोत्तम ॲथलिट पुरस्कार

- भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार राणी रामपाल हिला या वर्षीचा प्रतिष्ठेचा 'वर्ल्ड गेम्स सर्वोत्तम ॲथलीट' चा पुरस्कार जाहीर झाला आहे.
- हा पुरस्कार पटकवणारी राणी रामपाल ही पहिली हॉकीपटू ठरली आहे.
- चाहत्यांकडून गेली 20 दिवस मते मागवण्यात आल्यानंतर वर्ल्ड गेम्सने गुरुवारी पुरस्कार विजेत्यांची घोषणा केली. राणीने तब्बल 199477 मते मिळवत या पुरस्काराच्या शर्यतीत अग्रस्थान पटकावले.

## विद्या बाळ यांचे निधन

- महिलांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या विद्या बाळ यांचे 30 जानेवारी 2020 रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या 84 वर्षांच्या होत्या.
- विद्या बाळ या सामाजिक कार्यकर्त्या व स्त्रीवादी लेखिका होत्या. सुरुवातीच्या काळात त्यांनी पुणे आकाशवाणीवर दोन वर्षे कार्यक्रम सादरकर्त्या म्हणून नोकरी केली.
- 1964 ते 1983 या काळात त्यांनी 'स्त्री' मासिकाच्या सहाय्यक संपादक होत्या. 1983 ते 1986 या काळात त्या मुख्य संपादक होत्या.
- 1989 : 'मिळून साऱ्याजणी' हे मासिक सुरू केले.
- 1981: स्त्रियांच्या समस्यांवर काम करण्यासाठी 'नारी समता मंच' या संस्थेची स्थापना.
- ग्रामीण स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत करणाऱ्या 'ग्रोइंग टुगेदर' प्रकल्पाच्या प्रमुख म्हणून कार्य.
- पुरुष संवाद केंद्र, अक्षरस्पर्श ग्रंथालय, साथ साथ विवाह अभ्यास मंडळ, पुरुष उवाच अभ्यासवर्ग या संस्थाही त्यांनी सुरू केल्या.

**साहित्य :**
- वाळवंटातील वाट, जीवन हे असं आहे.
- मासिकात पहिल्या 20 वर्षांत प्रकाशित झालेल्या

निवडक 45 लेखांच्या संग्रहाचे 'स्त्रीमिती' नावाचे पुस्तक 2012 साली प्रसिद्ध झाले.

## 25 जानेवारी : मतदार दिन

- निवडणूक प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवा यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता हा दिवस साजरा केला जातो.
- 2020 ची संकल्पना : बळकट लोकशाहीसाठी निवडणूक साक्षरता Electoral Literacy For Stronger Democracy.

**महत्त्वाचे :**

- 25 जानेवारी 1950 ला राष्ट्रीय निवडणूक आयोग स्थापन झाला. 2011 साली त्याला 61 वर्षे पूर्ण झाली. या निमित्त तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाची सुरुवात केली.
- या वर्षीचा हा 10 वा राष्ट्रीय मतदार दिवस आहे.
- भारतात सर्व प्रकारच्या मतदानासाठी किमान वयोमर्यादा 18 वर्षे आहे. भारतात मतदारांची संख्या सुमारे 90 कोटी आहे जी एकूण राष्ट्रीय लोकसंख्येच्या 67% आहे.

## 25 जानेवारी : हिमाचल प्रदेश संपूर्ण राज्य दिवस

- 25 जानेवारीला हिमाचल प्रदेशमध्ये संपूर्ण राज्य दिवस म्हणून साजरा केला जातो. 25 जानेवारी 1971 रोजी हिमाचल प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला होता.
- स्वातंत्र्यानंतर 15 एप्रिल 1948 रोजी हिमाचल प्रदेशची स्थापना मुख्य आयुक्तांचा प्रांत म्हणून करण्यात आली. 25 जानेवारी 1950 रोजी हिमाचल प्रदेशाला 'ग' श्रेणीच्या राज्याचा दर्जा देण्यात आला.
- 1 नोव्हेंबर 1956 रोजी हिमाचल प्रदेशाला केंद्रशासित प्रदेश घोषित करण्यात आले. 1966 मध्ये पंजाबचा डोंगराळ प्रदेश हिमाचल प्रदेशात समाविष्ट करण्यात आला.
- डिसेंबर 1970 मध्ये संसदेने हिमाचलप्रदेश कायदा मंजूर केला आणि आणि 25 जानेवारी 1971 रोजी हिमाचल प्रदेश राज्य अस्तित्वात आले.

**महत्त्वाचे:**

- हिमाचल प्रदेश भारताचे 18वे राज्य होते.
- शिमला ही हिमाचल प्रदेशची राजधानी आहे.
- हिमाचल प्रदेश क्षेत्रफळ 55,673 चौरस किलोमीटर आहे.

## ठळक घडामोडी

1) तिसरी जागतिक बटाटा परिषद - गुजरात गांधीनगर.

2) 2024 सालापर्यंत सर्व रेल्वेगाड्या विजेवर करण्याचा भारतीय रेल्वेचा निर्णय.

3) कोबी ब्रायन बास्केटबॉलपटूचा अपघातात मृत्यू.

4) ऑक्सफर्ड हिंदी वर्ड ऑफ द इयर 2019 : संविधान.

5) अरुणाचल प्रदेश विधानसभा होणार पेपरलेस.

6) पुणे येथे 'अध्यापक विकास संस्था' स्थापनेस मंत्रिमंडळाची मंजुरी

7) कोरोना व्हायरस - WHO कडून जागतिक आणीबाणी घोषित.

8) एअर इंडियात 100% निर्गुंतवणूक - केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.

9) भारतात कोरोना व्हायरसचा पहिला रुग्ण केरळमध्ये आढळला.

10) आयबीएमच्या प्रमुखपदी अरविंद कृष्णा यांची निवड.